# हापूस



## मराठी शिक्षक पुस्तिका

# 7


**संकल्पना**
अनुज गुप्ता

**लेखिका**
मिनाक्षी आनंदा पवार

**संपादक**
विद्या रायकर



Harbour Press®
INTERNATIONAL

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १. | असो तुला देवा! माझा सदा नमस्कार | ३ |
| २. | स्वातंत्र्य की स्वैराचार | ४ |
| ३. | बाल्टोची सत्यकथा | ५ |
| ४. | मन वढाय वढाय | ६ |
| ५. | अनाथांच्या आई-सिंधूताई सपकाळ | ७ |
| ६. | अशी ही दीपावली | ८ |
| ७. | दानशूर कर्ण | ९ |
| ८. | नदी मिळता सागरा | ११ |
| ९. | वायू आणि मनुष्य जीवन | १२ |
| १०. | श्रावणमास | १३ |
| ११. | या झोपडीत माझ्या | १५ |
| १२. | हिरकणी गवळण | १६ |
| १३. | मायेची शिकवण | १७ |
| १४. | शिवरायांची गुरूभक्ती | १८ |
| १५. | अभंगवाणी | २० |
| १६. | व्याकरण | २१ |

# १ असो तुला देवा! माझा सदा नमस्कार

### ✦ काव्य परिचय

- प्रार्थना साने गुरूजी लिखित आहे. प्रार्थनेत कवीने ही सृष्टी देवाने निर्माण केली असून त्याच्या दया व प्रेमाला अंत नाही व त्याच्या कृपेने अनेक गोष्टी घडतात त्याचे वर्णन प्रार्थनेद्वारे केलेले आहे.

### ✦ उद्देश

- विद्यार्थ्यांच्या मनात श्रद्धेची, आदराची, कृतज्ञतेची भावना निर्माण करणे.
- प्रार्थनेमार्फत सृष्टीच्या सौंदर्याची ओळख करून देणे.
- प्रार्थनेमार्फत पाठांतराची सवय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
- प्रार्थनेमार्फत मराठी विषयाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकाने प्रार्थना शिकवण्यापूर्वी 'साने गुरूजींची त्यांच्या पुस्तकातील लेखात, कवितेत असलेल्या सहज सोप्या लेखनशैलीतून मानवतेची निसर्गाची व त्याचा आदर करण्याची शिकवण जी देणगी त्यांना आईकडून मिळाली त्याची ओळख करून देणे.
- देवाने ही सृष्टी निर्माण केली आहे असा मानवाच्या मनात श्रद्धास्थान आहे व त्या श्रद्धेपायी आपण त्याचा सांभाळ करतो व त्याची/देवाविषयीची कृतज्ञता व्यक्त करतो.
- अशीच देवाची कृतज्ञता व्यक्त करणारी कविता शिकूया अशामार्फत कवितेला सुरूवात करता येईल.
- शिक्षिकेने प्रथम संपूर्ण प्रार्थनेचे पार्थना स्वरून वाचन करावे. विद्यार्थ्यांना पाठोपाठ प्रार्थना म्हणण्यास सांगावी.
- प्रार्थनेच्या प्रत्येक ओळीचा अर्थ व कठीण शब्दांचा अर्थ विचारत समजवावा. विद्यार्थ्यांकडून संपूर्ण प्रार्थनेचा अर्थ पुन्हा म्हणवून घ्यावा.
- प्रार्थना पुन्हा एकदा तालासुरात म्हणवून घ्यावी. स्वाध्याय सोडवून घ्यावा.

### ✦ सामूहिक कार्य

- विद्यार्थ्यांचे गट करून एखादी प्रार्थना म्हणण्यास सांगावी.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. देवाच्या कृपेने फत्तराची (दगडाची) फुले होतील असे साने गुरूजी म्हणतात.

२. कवी परमेश्वराला नमस्कार करत आहे.

३. देवाच्या दयादातृत्वाला अंत नाही असे कवी म्हणतात.

४. देवाची कृपा होते तेव्हा शजन्माची मतृषा होते.

५. देवाच्या कृपेने पंगू सिंधूपार करतो.

**प्र २.** प्रार्थना म्हणजे देवाचे आभार व्यक्त करणे, प्रशंसा करणे. या कवितेत (प्रार्थनेत) साने गुरूजी सांगतात की देवाने सृष्टी निर्माण केली असून त्याच्या दया व प्रेमाला अंत नाही. त्याच्या कृपेने दगडाची फुले होतात, मातीचा मोती होतो, सर्पाचा हार होतो, रात्रीचा अंधार नष्ट होऊन दिवस उगवतो, विषाचे अमृत होते, अपंग/पांगळा सुद्धा नदी पार करतो अशा या सर्व किमया तुझ्या कृपेनेच शक्य होतात व त्याच्या कृपेने अनेक गोष्टी घडतात त्याचे वर्णन प्रार्थनेद्वारे केलेले आहे.

प्र ३. १. पंगू २. मुले ३. देव

प्र ४. १. परमेश्वर २. शेवट ३. साप

४. रात्र, रजनी ५. नमन, वंदन ६. सुमन

प्र ५. १. दानव २. शेवट ३. माझा ४. मृत्यू

प्र ६. १. देवी २. सर्पिण

## २ स्वातंत्र्य की स्वैराचार

### ✦ पाठ परिचय

- पाठात आपण आज प्रत्येकजण स्वतंत्र आहोत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मनुष्य सुख-सुविधांच्या पाठी इतका तंत्रज्ञानाच्या आधीन झाला की त्या स्वातंत्र्याचा स्वैराचार कसा होऊ लागला आहे, स्वैराचारामुळे पृथ्वीचे अस्तित्व कशाप्रकारे धोक्यात येत चालले आहे व त्यासाठी आपण काय करू शकतो? यावरील स्पष्टीकरण पाठात आलेले आहे.

### ✦ उद्‌देश

- स्वतंत्र आणि स्वैराचार यातील फरक विद्‌यार्थ्यांना करून देणे.
- देशाविषयी आपले कर्तव्य विद्‌यार्थ्यांना समजावून सांगणे.
- आपला देश यापेक्षा माझा देश ही भावना विद्‌यार्थ्यांमध्ये रूजविणे.

### ✦ अध्यापन कृती

- विद्‌यार्थ्यांना काही प्रश्न विचारावेत.

उदा.- १) तुम्ही गड, किल्ल्यांवर गेला आहात का?

२) चौपाटीवर फिरायला जाता तेव्हा तुम्हाल तिथल्या स्वच्छतेबाबत तुमचे काय मत आहे?

३) सार्वजनिक ठिकाणची उदाहरणे देऊन तेथील स्वच्छतेत जनता किती दक्ष असते याबाबत चर्चा करावी.

- विद्‌यार्थ्यांना दिलेल्या उत्तरातून त्यांना स्वैराचार म्हणजे काय? हे समजावून देणे. त्यानंतर विद्‌यार्थ्यांना स्वातंत्र्याचा आपण कसा स्वैराचार केला आहे हे पाठातून शिकूया अशा प्रकारे पाठ समजावणे.

### ✦ उत्तरे

प्र १. १. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येकजण नवनवीन सुधारणा करण्याच्या दिशेने कार्य करू लागले. झाडे तोडून जंगले नष्ट केली. तेथे कारखाने, मोठमोठ्या इमारती अशा प्रकारे कार्य करत गेले. पुढे पाण्याच्या समस्या वाढल्या. नद्‌या अस्वच्छ झाल्या, प्रदुषण वाढले. इतकेच नाही तर स्वच्छतेच्या समस्या, अत्याचार, भ्रष्टचार, गड किल्ल्यांची दुरावस्था, सोशल मिडियाचा अतिरेक, तंत्रज्ञानाच्या दुरूपयोगाने एकमेकांना फसवणे, वडिलांच्या संस्कारांचे जतन न करता त्याचे फळ त्यांना वृद्‌धाश्रमात टाकणे....अशा एक ना अनेक गोष्टी आपण फक्त स्वातंत्र्याच्या स्वैराचारामुळे कळत-नकळत करत आहोत.

२. स्वातंत्र्याचा योग्य वापर केला तर आपण दरवर्षी शिक्षाकांच्या किंवा स्थानिक लोकांच्या व मोठ्या लोकांच्या मदतीने वृक्षारोपण करू शकतो. स्वच्छतेचे नियम, वृद्‌ध मंडळींना वृद्‌धाश्रमात न टाकता ज्या मुलांना त्यांचा सहवास मिळत नाही त्यांच्यासाठी वृद्‌ध मंडळींचे काही लहान मुलांचे कार्यक्रम आयोजित करणे, वृक्षतोड होत असल्यास एक

देशाचा नागरिक म्हणून हक्काने चुकी निदर्शनास आणून देणे. अशा व अजून वेगवेगळ्या गोष्टी आपण करू शकतो.

३. कोणतीही वस्तू 'माझी' असं वाटतं तेव्हा आपण तिची जितकी काळजी घेतो, तितकी 'आपली' म्हटल्यावर घेतोच असे नाही, म्हणून आपलं म्हटले की प्रत्येकाची जबाबदारी आहे माझीच एकट्याची नाही असे आपण समजतो. हा फरक दोघांमधे आहे. कारण माझं म्हटल्यावरती आपण कोणतेही काम मनापासून करतो व वस्तूचा सांभाळही मनापासून करतो.

**प्र २.** १. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येकजण नवनवीन सुधारणा करण्याच्या दिशेने निघाला.

२. आज आईवडिलांनी दिलेल्या संस्काराचे फळ त्यांना वृद्धाश्रम मिळते.

३. कोणत्याही कामाची सुरूवात स्वत:पासून केली पाहिजे.

**प्र ३.** १. सुधारणा घडवून आणताना एक दिवस आपण स्वैराचार तर करत नाही? हा प्रश्न त्याने कधी स्वत:ला विचारलाच नाही.

२. जो बळीराजा साऱ्या देशाला अन्न देतो, त्याच बळीराजाला एका वेळेच अन्न मिळत नाही.

**प्र ४.** १. शूर २. भाग ३. अडचण

४. धरणी, पृथ्वी ५. मर्यादा

**प्र ५.** १. पारतंत्र २. अस्वच्छ ३. शेवट

४. सोपे ५. वाईट

**प्र ६.** १. पुल्लिंग २. स्त्रीलिंग ३. पुल्लिंग

४. नपुंसकलिंग ५. नपुंसकलिंग

**प्र ७.** १. एक २. एक व अनेक (दोन्ही)

३. अनेक ४. एक व अनेक (दोन्ही)

५. अनेक

## ३ बाल्टोची सत्यकथा

### ✦ पाठ परिचय

- १९२५ ची घटना. अमेरिकेतील अलास्कामधील 'नोम' गावात थंडगार वातावरणामुळे घटसर्पाची साथ येते. त्यावेळी बर्फाच्या वादळामुळे नोम गावाचा इतर गावांशी संपर्क तुटतो व घटसर्पावरील औषध हे अलास्कामधील मुख्य दवाखान्यातच उपलब्ध होते. रेल्वेरूळांवरही बर्फ पडल्याने रेल्वेची सेवा बंद होते. केवळ एकच मार्ग उपलब्ध होतो तो म्हणजे कुत्र्यांच्या गाड्यांचा. या कुत्र्यांच्या गाडीचा मालक गुन्नार व त्याच्या गाडीचा मुख्य कुत्रा बाल्टो. या बाल्टो कुत्र्याच्या पराक्रमामुळे गावात घटसर्पावरील औषध कसे मिळाले व मुलांचे प्राण वाचले यावरील कथा वर्णिली आहे.

### ✦ उद्देश

- पाठातून एका कुत्र्याच्या पराक्रमाची ओळख करून देणे.
- युक्तीने अवघड काम कसे शक्य होते हे विद्यार्थ्यांना कथेमार्फत समजावणे.
- कथेमार्फत मराठी विषयाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी पाठ गोष्टीरूपाने प्रथम समजून सांगावा त्यानंतर पाठ्य पुस्तकातील पाठ समजावून कठीण शब्द व प्रश्नोत्तराची उजळणी करवून घ्यावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. 'नोम' गाव पूर्णपणे बर्फाच्छादित झाले होते त्यावेळी थंडगार वातावरणामुळे या गावातील मुले अचानक आजारी पडली तेव्हा गावातील डॉक्टरांनी घटसर्पाचे निदान केले आणि औषधेही ताबडतोब दिलीच पाहिजे असे सांगितले. डॉक्टरांनी सांगितलेले औषध 'नोम' गावात मिळत नव्हते. हे औषध त्या वेळेस फक्त आलास्काच्या मुख्य दवाखान्यात उपलब्ध होते; म्हणून नोमपासून ८०० मैल दूर असलेल्या आलास्काच्या दवाखान्यात औषधे घेण्यास जावे लागणार होते.

२. 'नोम' गावात थंडगार वातावरणामुळे गावातील मुले अचानक आजारी पडली. डॉक्टरांनी घटसर्पाचे निदान केले. त्यावेळी हे औषध केवळ अलास्काच्या मुख्य दवाखान्यात उपलब्ध होते. तो दवाखाना नोमपासून ८०० मैल दूर होता. रेल्वेने औषध आणण्याचा प्रयत्न झाला; पण १०० मैल गेल्यावर बर्फाच्या वादळामुळे रेल्वेरूळांवर बर्फ पडल्याने रेल्वेची सेवा बंद झाली; त्यावेळी एकच मार्ग उपलब्ध होता तो म्हणजे कुत्र्यांच्या गाड्यांचा; म्हणून रेल्वेमार्गाने औषध न आणता कुत्र्यांच्या गाड्यांचा वापर करावा लागला.

**प्र २.** १. पाचव्या गाडीचा मालक गुन्नार होता.

२. बाल्टोची गाडी औषधे घेऊन गावाजवळ आली तेव्हा पहाटेचे तीन वाजले होते.

३. नोम गावातील मुलांना घटसर्प हा साथीचा रोग झाला होता.

४. घटसर्प झालेल्या रोग्यांना औषध पाच दिवसांनी मिळाले.

५. बाल्टोचा पुतळा न्यूयॉर्कच्या सेंट्रल पार्कमध्ये आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. बाल्टो | २. गुन्नार | ३. डॉक्टर | |
| **प्र ४.** | १. अलास्कामध्ये | २. घटसर्पाच्या | ३. वातावरणात | ४. वेगाने |
| **प्र ५.** | १. श्वान | २. गाव | ३. संकट, फसवणूक | ४. सरिता |
| | ५. रस्ता | ६. शक्कल | | |
| **प्र ६.** | १. गरम | २. अस्वच्छ | ३. ढ, मठ्ठ | |
| | ४. आडवा | ५. मागे | | |
| **प्र ७.** | १. एकवचन | २. अनेकवचन | ३. अनेकवचन | ४. एकवचन |
| **प्र ८.** | १. शीलवान | २. नशीबवान | ३. धैर्यवान | |
| | ४. गुणवान | ५. बलवान | | |

## ४ मन वढाय वढाय

✦ **काव्य परिचय**

- 'मन वढाय वढाय' या कवितेत बहिणाबाईंनी मन कसे चंचल असते व ते एका ठिकाणी स्थिर नसते; हे मनाला वेगवेगळी उपमा देऊन कवितेत सांगितलेले आहे.

✦ **उद्देश**

- मनाची चंचलता व ते कसे स्थिर ठेवावे याबाबत विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- मानवी मनाची ओळख करून देणे.
- खानदेशी भाषेची ओळख करून देणे.
- पाठांतराची सवय लावणे.
- मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- कविता शिकविण्यापूर्वी शिक्षकांनी बहिणाबाई चौधरी यांच्या विषयी विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती द्यावी.
- शिक्षिकेने आपले मन कसे एका गोष्टीवरून दुसऱ्या गोष्टीवर जाते. मनातील विचार बदलतात, कधी राग, कधी प्रेम ह्या अवस्था निर्माण होतात. ह्या मनाच्या चंचलतेविषयी स्पष्टता देणे.
- कवितेतील प्रत्येक ओळीचा व शब्दाचा अर्थ सांगून विद्यार्थ्यांना कविता शिकवावी. खानदेशी भाषेतील शब्द व प्रमाण भाषेतील शब्दांची सविस्तर ओळख करून द्यावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. 'मन वढाय वढाय' या कवितेतून बहिणाबाई देवाला म्हणतात की, "हे देवा, तू कसे चंचल मन दिले आहे की जे स्थिर नाही. तू एक योगी आहे व ही तुझी करामत वेगळीच आहे. मन असं कसं आहे? की जागेपनीही तुझे स्वप्न बघतं."

२. 'मन वढाय वढाय' या कवितेत चंचल मनासाठी पुढील उदाहरणे आली आहेत:

१) पिकावरची ढोर/जनावर, २) पाण्यावरील लाट, ३) लहरी, ४) विषारी, ५) पाखरू, ६) वीज, ७) खाकसचा दाणा म्हणजेच खसखसचा दाणा.

३. पिकातल्या जनावरांचे उदाहरण देताना कवयित्री म्हणते की जसे जनावरांना हाकलले तरी ते पिकांसाठी (पिकाला खाण्यासाठी) परत-परत शेतात येतातच तसे मनाला कितीही आवरण्याचा प्रयत्न केला तरीही ते एका विश्वात रमलेले असते. मनाला पाण्याच्या धारेसारखी ओढ असते व नाव वल्हवतांना जशा लाटा वाऱ्यापेक्षाही जास्त वेगाने येतात तशाच लाटा मनातही येतात.

**प्र २.** १. 'मन वढाय वढाय' या कवितेच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी आहेत.

२. कवयित्री बहिणाबाईंनी कवितेत चंचल मनाचे वर्णन केलेले आहे.

३. मनाला पाण्याच्या धारेसारखी ओढ असते.

४. मनाला खसखसच्या दाण्याएवढे छोटे असू शकते असे कवयित्री म्हणतात.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | ढोर | २. | मन | ३. | देव/परमेश्वर | | |
| **प्र ४.** | १. | चित्त | २. | पवन | ३. | जमीन | | |
| | ४. | नभ | ५. | परमेश्वर | ६. | लहर | ७. | पक्षी |
| **प्र ५.** | १. | भात, आत | २. | खास, चाक | ३. | राम, मत | ४. | भुई, वर |
| **प्र ६.** | १. | स्वप्न | २. | आभाळ | ३. | न्यारे | | |
| | ४. | वीज | ५. | दिले | | | | |

## ५ अनाथांच्या आई-सिंधूताई सपकाळ

✦ **पाठ परिचय**

- सिंधूताई सपकाळ या महान समाजसेविकेचे बालपण, त्यांचे कष्टमय खडतर, जीवन प्रवास व त्यांचे कार्य यांची ओळख पाठात आलेली आहे.

✦ **उद्देश**

- एका समाजसेविकेची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
- कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन आपण नवीन जीवनाची कशी सुरूवात करू शकतो हे समजावणे.
- सिंधुताई सपकाळांची ओळख करून देणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी सिंधूताई सपकाळ यांच्या जीवनावर आधारित चित्रपट/व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवून प्रथम त्यांची ओळख करून देणे.
- पाठ शिकवताना पाठातील घटना विद्यार्थ्यांना सविस्तर सांगाव्यात.
- कठीण शब्द व स्वाध्याय यावर चर्चा करावी.

### ✦ अध्यापन कृती

- विद्यार्थ्यांना 'सिंधूताई सपकाळ' यांची माहिती जमवून प्रकल्प कार्य बनवण्यास देणे.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. "ज्यांना कोणीच नाही त्या सर्वांसाठी मी आहे." असे सिंधुताई आपल्या बोलण्यातून नेहमी सांगत. त्यांनी समाजाने धुडकारलेल्या, स्वकीयांच्या प्रेमाला पारख्या झालेल्या, हजारो निराधारांना आपल्या मायेच्या स्पर्शाने आपलेसे केले. म्हणून त्यांना 'अनाथांच्या आई' नावाने संबोधले जाते.

२. सिंधुताईच्या नवऱ्याचा शेकडो गुरं वाळणे हा व्यवसाय ठरला होता. इतक्या गुरांचे शेण काढता-काढता कंबर मोडायची हा त्रास असह्य झाल्यानंतर त्यांनी बंड पुकारला.

**प्र २.** १. सिंधुताई आपल्या बोलण्यातून नेहमी सांगत की ज्यांना कोणीच नाही त्या सर्वांसाठी मी आहे.

२. सिंधुताईचे टोपणनाव 'चिंधी' हे होते.

३. सिंधुताईचे वयाच्या अकराव्या वर्षी लग्न झाले.

४. सिंधुताईंना २०२१ मध्ये पद्मश्री पुरस्कार हा साकाजिक कार्य श्रेणीत मिळाला.

५. सिंधुताईंना 'माई' या नावाने संबोधले जात असे.

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. सिंधुताई सपकाळ | २. ताईंचे पती | |
| | ३. सिंधुताईचे पती | | |
| **प्र ४.** | १. माया | २. साहस, शौर्य | ३. स्त्री |
| | ४. शंका | ५. दिन | |
| **प्र ५.** | १. परकीय | २. मृत्यू | ३. मान |
| | ४. सनाथ | ५. कमी | |
| **प्र ६.** | १. निराधार | २. अनाथ | ३. महाराष्ट्र |
| | ४. शिक्षण | ५. पुरस्कार | |
| **प्र ७.** | १. विरोध करणे | २. विजय मिळविणे | ३. मदत करणे |

## ६ अशी ही दीपावली

### ✦ पाठ परिचय

- रांगोळी, कंदील, फटाके, नवील कपडे, फराळ अशा पारंपारिक पद्धतीने आपण नेहमीच दिवाळी साजरी करतो; परंतु वैभव, अनिकेत व त्याचे मित्र वेगळ्या पद्धतीने दिवाळी साजरी करतात. ती कशी व का? याचे वर्णन पाठात आलेले आहे.

### ✦ उद्देश

- साण साजरे करण्याची नवीन पद्धत विद्यार्थ्यांना समजावणे. त्याचे फायदे समजावणे.

- पर्यावरणाविषयी जागृतता विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थी सण कसे साजरे करतात यावर शिक्षक चर्चा करतील.
- पारंपारीक पद्धती सोडून नवीन पद्धतीने सण कसे साजरे करू शकतात? हे विचारावे.
- असाच नवीन पद्धतीने काही मुले दीपावली हा सण साजरा करत आहे? ते कसे हे आपण 'अशी ही दीपावली' या पाठातून पाहूया. अशा पद्धतीने शिक्षक पाठाला सुरूवात करू शकतात.
- पाठातील कठीण शब्द व स्वाध्याय यावर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. दीपावलीला प्रकाशाचा सण म्हणतात.

२. दीपावली हा सण घरोघरी असंख्य दिवे लावून साजरा केला जातो.

३. फटाक्यांमुळे हवेत धूर पसरतो व त्यामुळे प्रदूषण वाढते.

४. मुलांनी फटाक्यांचे पैसे जमा केले आणि गावातील गरीब मुलांना तसेच अपंग शाळेत, अनाथ मुलांना मदत म्हणून दिले.

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र २.** | १. बरोबर | २. चूक | ३. बरोबर |
| **प्र ३.** | १. आधुनिक | २. प्रदूषण | ३. अनंद |
| **प्र ४.** | १. उत्सव | २. उजेड | ३. दुर्घटना |
| | ४. दीन | ५. स्वास्थ्य | |
| **प्र ५.** | १. श्रीमंत | २. अंधार | ३. दु:ख |
| | ४. खर्च | ५. शत्रू | |
| **प्र ६.** | १. मैत्रीण | २. वडील | ३. मुलगी |
| **प्र ७.** | १. अनेक | २. एक | ३. एक |
| | ४. अनेक | ५. एक | |
| **प्र ८.** | १. नवरात्री | २. नागपंचमी | ३. दीपावली |
| | ४. गुढीपाडवा | ५. पोळा | |

## ७ दानशूर कर्ण

✦ **पाठ परिचय**

- कर्ण हा महाभारतातील एक पात्र. कर्ण हा दानशून म्हणून प्रसिद्ध होता. युद्धामध्ये अर्जुन कर्णाचा जेव्हा वध करतो व कर्ण शेवटची घटका मोजत असतो; तेव्हा श्रीकृष्ण ब्राम्हणाचे वेश घेऊन त्याच्या दानशूरपणाची कशी परीक्षा घेतो व त्यात तो विजयी होतो. याचे वर्णन पाठात केलेले आहे.

✦ **उद्देश**

- महाभारत व त्यातील पात्रांची ओळख करून देणे.
- पौराणिक कथेबद्दल जिज्ञासा निर्माण करणे.
- कर्ण या योद्ध्याची व त्याच्या दानशूर स्वभावाची ओळख करून देणे.
- गोष्टीरूपाने मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

## ✦ अध्यापन कृती

- महाभारत व त्यातील पात्र यांची विद्यार्थ्यांना प्रथम ओळख करून देणे.
- शिक्षकांनी कर्णाविषयीची ओळख विद्यार्थ्यांना करून द्यावी. पाठातील कथा गोष्टीरूपाने सांगावी.
- पाठ शिकवताना पौराणिक काळातील युद्ध त्यावेळी योद्धांचे वचन, शपथ त्यासाठी प्राणाची ही आहुती देण्याचा त्यांचा स्वभाव व शौर्य यांची कल्पना विद्यार्थ्यांना देणे.
- नंतर पाठ विद्यार्थ्यांना कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांकडून विचारत समजवावा. पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. कर्ण हा दानशूर म्हणून प्रसिद्ध होता म्हणून श्रीकृष्णाने तो शेवटच्या घटका मोजत असताना त्याची परीक्षा घेण्याचे ठरवले. श्रीकृष्ण ब्राम्हणाचा वेश धारण करून कर्णाजवळ जातात व सोन्याचे दान मागतात. त्यावेळी ब्राम्हणाला काय द्यावे असा प्रश्न कर्णाला पडतो. कर्णाला अचानक आठवते व तो ब्राम्हणाला आपले सोन्याचे दात तोडून घेण्यास सांगतो. ब्राम्हण हे कृत्य पाप असल्याचे सांगतो व दात स्वीकारण्यास मनाई करतो. जीवनाच्या अंतिम क्षणी ब्राम्हणाला काय द्यावे, रिकाम्या हाताने पाठवणेही योग्य नाही म्हणून कर्ण स्वतः दगडाने आपले दात तोडून देतो त्यावर ब्राम्हण रक्ताने माखलेले अशुद्ध दात घेण्यास नकार देतो. त्यानंतर जखमी अवस्थेमध्येच कर्ण आपल्या धनुष्याने एक बाण आकाशात मारतो आणि वर्षा सुरू होते. त्या पाण्याने दात धुतले जातात व शुद्ध होतात. अशा प्रकारे जीवनाच्या अंतिम क्षणी दान करणे सोडत नाही हे या प्रसंगातून कळते.

२. विद्यार्थ्यांनी स्वयं अध्ययनातून पाठातून दानशूर कर्णाची माहिती थोडक्यात लिहावी.

**प्र २.** १. कर्ण हा महाभारतातील कुंती आणि सूर्य यांचा पुत्र होता.

२. सूर्यपुत्राला जन्मतः अंगावर अभेद्य कवच आणि कानात कुंडले होती.

३. ब्राम्हणाचा वेश धारण करून कर्णाजवळ श्रीकृष्ण येतात.

४. कुंतीने घाबरून मुलाला गंगा नदीत सोडले.

५. श्रीकृष्ण महारथी कर्णाची अंतिम परीक्षा घेण्याचे ठरवितात.

**प्र ३.** १. अधिरथ आणि त्याची पत्नी राधा    २. कुंती

३. कर्ण

**प्र ४.** १. महा, भारत, मत    २. वर, दान, वन

३. रथ, चालक, कर

**प्र ५.** १. सूत    २. आनंदी    ३. रवी, भास्कर

४. शेवट    ५. दात    ६. साल

**प्र ६.** १. अप्रसन्न    २. अनेक ३. शाप

४. शुद्ध    ५. मरण

**प्र ७.** १. रथ    २. ऋषी    ३. नद्या    ४. मुल्ये

**प्र ८.** १. पुत्री    २. कुमार    ३. पिता    ४. पती

# ८ नदी मिळता सागरा

✦ **काव्य परिचय**

- कवितेत नदी सागराला मिळण्यासाठी धडपडते; ती सागराला मिळते तरीही जन्म देणा आपल्या वडिलांना म्हणजेच डोंगराला वाफेचे रूप घेऊन भेटते. हे तिचे जीवनचक्र सतत चालूच असते. नदीच्या अशा सुंदर जीवनप्रवासाचे वर्णन कवितेत आलेले आहे. (मुलगी-सासर-माहेर)

✦ **उद्‌देश**

- आपल्याला आयुष्यात जे हवे आहे; ते मिळाले तरी जन्मदात्या आई-वडिलांना विसरू नये ही जाणीव विद्‌यार्थ्यांना करून देणे.
- नदीच्या रूपाने निसर्गाचे जीवनचक्र विद्‌यार्थ्यांना समजावणे.
- नसारख्याच नैसर्गिक घटकांची जपणूक करण्याची विद्‌यार्थ्यांना जाणीव करून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांकडून छोटे-छोटे प्रश्न विचारून नदीच्या पाण्याचे पावसात कसे रूपांतर होते ते विचारून घेणे.

  उदा.- १) नदीचा उगम कोठून होतो?

  २) नदी कोणाला जाऊन मिळते?

  ३) ढग कसे बनतात?

  अशा प्रश्नांच्या उत्तरातून कवितेचा मूळभाव विद्‌यार्थ्यांना समजावणे.

- पाठ्‌यपुस्तकातील कविता अर्थासह अभिनय करून समजावणे कवितेखाली प्रश्नांवर चर्चा करणे.
- ताला-सुरात कविता म्हणून घ्यावी. कवितेखालील स्वाध्याय सोडवून घ्यावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. कवितेत कवीने नदीला माहेर नसते ही शहाण्यांची म्हण सांगितली आहे.

२. नदी माहेराशी जाते म्हणून जग चालते असे कवी म्हणतात.

३. सागर नदीचे सारे जीवन पोटात घेतो.

४. नदीचा जन्मदाता सागर आहे.

५. नदी वाऱ्याचे पंख लावून तरंगत जाते.

६. पुन्हा लेकरू होऊन नदी वाळा वाजवते.

**प्र २.** नदीचा उगम डोंगरातून होतो. नदी एकदा समुद्राला मिळाली की परत पर्वताकडे जात नाही म्हणून नदीला माहेर नाही असे म्हणतात पण या कवितेतून हा समज खोडून काढत जलचक्राचे सुंदर वर्णन या कवितेतून केलेले आहे. कवितेत नदी सागराला मिळण्यासाठी धडपडते; ती सागराला मिळते तरीही जन्म देणाऱ्या आपल्या वडिलांना म्हणजेच डोंगराला वाफेचे रूप घेऊन भेटते. पुन्हा जन्म घेऊन पुढे-पुढे जाते. हे तिचे जीवनचक्र सतत चालूच असते. नदीच्या अशा सुंदर जीवनप्रवासाचे वर्णन कवितेत केलेले आहे.

**प्र ३.** नदी वाहत वाहत सागराला मिळते; परंतू ती आपल्या जन्मदात्या डोंगराला विसरत नाही. ती वाफेचे रूप घेते, वाऱ्याचे पंख लावते म्हणजेच वाऱ्यावर ती वाफ हलकी होऊन तरंगत वर जाते व नदी वाफेच्या रूपाने डोंगराला भेटते.

**प्र ४.** १. सागर २. नदी/वाफ ३. नदी ४. नदी

**प्र ५.** १. सरिता २. समुद्र ३. दुनिया ४. आयुष्य
५. अंध ६. पर ७. पर्वत ८. पवन

**प्र ६.** १. सासर २. आत ३. मृत्यू ४. वेडा
५. विसरणे

**प्र ७.** १. एक २. अनेक ३. एक

**प्र ८.** १. माहेर , आहेर २. मग, खग ३. पारा, थारा
४. काळा, बाळा ५. माय, पाय

**प्र ९.** १. वारा – आज थंडगार वारा सुटला होता.
२. जन्म – श्रीकृष्णाचा जन्म हा गोकुळाष्टमी म्हणून साजरा केला जातो.
३. तरंगत – कागदी बोट पाण्यात तरंगताना पाहून मला लहानपणीची आठवण झाली.
४. डोंगर – मुंबईत डोंगरांची संख्या कमी होत चालली आहे.
५. बाहेर – आज पाऊस पडत असल्याने आईने मला खेळायला बाहेर पाठवलेच नाही.

## ९ वायू आणि मनुष्य जीवन

✦ **पाठ परिचय**

- वायू म्हणजे पवन, हवा. पर्यावरणातील ऑक्सिजन सजीवसृष्टीसाठी किती महत्त्वपूर्ण आहे व जर त्याचे प्रमाण कमी झाले तर काय परिणाम होऊ शकतो; तसेच हा पर्यावरणातील प्राणवायू शुद्ध ठेवण्यासाठी आपण काय–काय उपाययोजना करू शकतो याची सविस्तर माहिती पाठात दिलेली आहे.

✦ **उद्देश**

- हवेतील प्रदूषण कसे थांबवता येईल/कमी करता येईल याबाबत विद्यार्थ्यांना जागृत करणे.
- प्रदूषणाची कारणे विद्यार्थ्यांना प्रकर्षाने समजावणे.
- प्रदूषामुळे होणाऱ्या त्रासाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- हवेतील प्रदूषण कसे वाढते? प्रदूषण कमी करण्यासाठी आपण काय दक्षता घेतली पाहिजे? तुम्ही प्रदूषण होऊ नये यासाठी काय करता? ऑक्सिजनचा उपयोग कशासाठी होतो? कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण कधी व कसे वाढते? त्यामुळे काय नुकसान होते? अशा प्रश्नामार्फत पाठाचा पूर्ण आढावा विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावा. नंतर पाठ्यपुस्तकातील पाठावर चर्चा करावी.
- कठीण शब्दांचा अर्थ व स्वाध्यायवर चर्चा करावी.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांकडून प्रदूषणावरील उपाय यावर प्रकल्प कार्य करवून घेणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. घरोघरी तुळसी वृंदावन लावली जातात. तुळशीमुळे अखंड प्राणवायू मिळत असतो. वडाच्या झाडामुळे मिळणारा ऑक्सिजन हा खूप दूरपर्यंत मिळत असतो. तसेच वडाचे झाड हे वर्षानुवर्षे टिकते; त्यामुळे अनेक पिढ्यांना पुरेल इतका प्राणवायू मिळतो. वडाप्रमाणेच कडुलिंब, पिंपळ ही झाडेही जास्त प्रमाणात ऑक्सिजन देतात.

२. मानव श्वास घेताना वायूमंडळातून ऑक्सिजन ग्रहण करत असतो आणि कार्बनडाय

ऑक्साईड सोडतात व झाडे कार्बनडाय ऑक्साईड ग्रहण करत असतात व ऑक्सिजन हवेत सोडतात.

३. १) चुलीत जाळ होत नसेल तर त्यावेळी फुंकणीने, तोंडाने किंवा पंख्यासारखे काही हातात घेऊन हवा घातली जाते.

२) मेणबत्ती जळण्यासाठी ऑक्सिजनची आवश्यकता असते.

४. कोरोनाच्या जागतिक साथीच्या रोगात लॉकडाऊनमुळे कारखाने, गाड्या सगळ्या बंद झाल्यामुळे धरतीवर वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी झाले होते. त्यामुळे नद्यांचे पाणी शुद्ध झाले. पशू-पक्षी स्वैरपणे फिरू लागले होते.

**प्र २** १. सजीव सृष्टीच्या दृष्टीने आवश्यक असे जीवनरक्षक तत्व वायू होय.

२. कार्बनडाय ऑक्साईडची अधिकता झाल्यास चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, उलटी अशी वेगवेगळी लक्षणे दिसू लागतात.

३. भविष्यात आपले जीवन वाचवण्यासाठी सरकारच्या मदतीने उपाययोजना केल्या पाहिजे.

४. वायू म्हणजे पवन, हवा, जीवन, प्राणवायू.

**प्र ३.** १. झाडे  २. ऑक्सिजन  ३. पशु, पक्षी

**प्र ४.** १. निसर्ग  २. जल  ३. खग
४. शास्त्र  ५. भूमी

**प्र ५.** १. मरण  २. निर्जिव  ३. जवळ
४. अनावश्यक  ५. सोपे  ६. अधर्म

**प्र ६.** १. एकवचन  २. अनेकवचन  ३. अनेकवचन
४. एकवचन  ५. एकवचन

**प्र ७.** १. जीव वन नर रक्षक
२. मानव प्रमाणे नवा मामा
३. जवळ जव जरा वळ

## १० श्रावणमास

✦ **पाठ परिचय**

- पाठात हिंदू धर्मातील पवित्र महिना 'श्रावण' याविषयी माहिती दिलेली आहे.
  - श्रावाण महिन्यातील पूजा-व्रतवैकल्ये
  - श्रावाण महिन्यातील सण
  - श्रावाण महिन्यातील निसर्ग
  - चातुर्मास
  - या सर्वांविषयी थोडक्यात माहिती दिलेली आहे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना श्रावाण महिन्याचे महत्त्व समजावणे.
- विद्यार्थ्यांना हिंदू धर्मातील सणांची ओळख करून देणे.
- विद्यार्थ्यांना निसर्गाचा सांभाळ करण्याबाबत जागृत करणे.

## ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारावेत व त्यातून श्रावण महिना व त्याची माहिती काढण्याचा प्रयत्न करावा.

  उदा.- १. हिंदू मराठी महिने कोणते?
  २. पावसाळा कोणत्या महिन्यात सुरू होतो?
  ३. तेव्हा कोणकोणते सण येतात?
  ४. श्रावण महिन्यात कोणकोणते सण येतात?

  अशा प्रश्नांच्या उत्तरातून पाठातील माहिती काढण्याचा प्रयत्न करावा.

- नंतर पाठ्यपुस्तकातील पाठ कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांना विचारत-विचारत समजवावा. पाठाखालील स्वाध्याय विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावा.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. श्रावण महिन्यात नागपंचमी, मंगळागौर, श्रावणी सोमवार, नारळी पौर्णिमा, राखी पौर्णिमा, जन्माष्टमी, गोपाळकाला, बैलपोळा इत्यादी सण साजरे केले जातात.

२. श्रावण महिना हा पावसाळा ह्या ऋतूत येतो. जिकडे तिकडे हिरवळ पसरलेली असते. निसर्ग बहरलेला असतो. म्हणून श्रावण महिना म्हणजे निसर्गाची रंगपंचमी असे म्हटले आहे.

**प्र २.** १. श्रावण महिन्याचे नाव श्रवण नक्षत्रावरून ठेवण्यात आले.

२. श्रावण महिना एक मांगल्याचे प्रतीक असलेला महिना आहे.

३. श्रावण अमावस्या 'पिठोरी अमावस्या' या नावाने संबोधली जाते.

४. चातुर्मासात आहारविहारावर नियंत्रण करायला हवे.

**प्र ३.** १. समुद्राचा कोप (राग) होऊ नये, जहाजे, नौका, सुरक्षित रहाव्यात, समुद्र शांत होण्यासाठी कोळी बांधव या दिवशी समुद्राची पूजा करतात. पूजेसाठी या दिवशी समुद्राला यथाशक्तीप्रमाणे सोन्याचा नारळ किंवा नारळ अर्पण करतात म्हणून या सणाला 'नारळी पौर्णिमा' असे म्हणतात. यादिवशी कोळी लोक आपल्या होड्या घेऊन मासेमारी करण्यासाठी समुद्रात जातात.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ४.** | १. मास | | २. परमेश्वर | | ३. सागर | |
| | ४. मग्न, तल्लीन | | ५. सरिता | | | |
| **प्र ५.** | १. अमावस्या | | २. सैल | | ३. शेवट | |
| | ४. दु:ख | | ५. अपवित्र | | | |
| **प्र ६.** | १. पौर्णिमा | | २. शंकर | | ३. कार्तिक | |
| | ४. मंगळागौर | | ५. आरोग्य | | | |
| **प्र ७.** | १. चैत्र | | २. वैशाख | | ३. ज्येष्ठ | |
| | ४. आषाढ | | ५. श्रावण | | ६. भाद्रपद | |
| | ७. आश्विन | | ८. कार्तिक | | ९. मार्गशीर्ष | |
| | १०. पौष | | ११. माघ | | १२. फाल्गुन | |

## ११ या झोपडीत माझ्या

✦ **काव्य परिचय**

- संत तुकडोजी महाराजांनी आपल्या कवितेत राजाच्या राजमहाली सर्व सुखसोयी असूनही माझ्या, झोपडीत कशी सुख, शांती समाधान आहे हे सांगितलेले आहे.

✦ **उद्देश**

- सुख कशात मानावे हे विद्यार्थ्यांना समजवण्याचा प्रयत्न करणे.
- झोपडीतील लोकं ही काहीवेळा महालात राहणाऱ्या लोकांपेक्षाही सुखी असतात; हे उदाहरणातून पटवून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना झोपडीतील जीवन व महाली जीवन यातील तफावत समजून देणे.

उदा.- झोपडीतील लोकांकडे पैशाची कमतरता असते त्यामुळे चोरीची भीती नाही. महालात चोरी, दरोड्याची चिंता. झोपडीत एक कडी असेल कुलूप नाही, पहारे वैगरेची काळजी नसते. पण महालात घरांना कुलूपे, पहारे यांची सोय असते.

अशा प्रकारे झोपडी व महाल यांच्यातील सुखसोयीच्या वस्तूंमधील तफावत प्रथम समजून देणे; त्यानंतर जर मौल्यवान वस्तूचं नसल्या तर कोणत्याही गोष्टींची चिंता नसते. झोपडीत सुखसोयी, चैनीच्या गोष्टी कमी असल्यातरी कसे सुख असते हे कवितेमार्फत समजावून देणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. कवितेत जी सौख्य राजास महाली मिळाली नाही ती झोपडीत मिळाली.
२. 'या झोपडीत माझ्या' या कवितेचे कवी संत तुकडोजी महाराज आहेत.
३. तुकडोजी महाराजांना झोपडीत रात्रीचे आकाशातील सौंदर्य न्याहाळता येते.
४. तुकडोजी महाराजांच्या झोपडीत देवेंद्रला लाजवेल इतके सौख्य भरभरून आहे.
५. 'या झोपडीत माझ्या' या कवितेत कवीने आपल्या झोपडीत असलेल्या सौख्य, सुखाचे वर्णन केलेले आहे.

**प्र २.** तुकडोजी महाराज कवितेतून सांगतात की राजमहाली जे सुख नसेल ते माझ्या झोपडीत आहे. राजमहालात तिजोऱ्या आणि कडक पहारे असूनही संपत्तीची चोरी होते. माझ्या झोपडीत दाराला साधी दोरीही नाही. कारण चोरी जायला काही संपत्तीच माझ्याकडे नाही. माझ्याकडे पारमार्थिक संपत्ती आहे तसेच महालात पहारे असतात म्हणून अनेकांना बंदी असते. विशिष्ट लोकंच जाऊ शकतात. परंतु माझ्या झोपडीत कोणतीही भीती नाही, येणाऱ्यांना बंधन नाही. महालामध्ये अनेक सुविधा असतात पण आम्हा सामान्यांना आहे. त्या परिस्थितीच समाधान असते. तुकडोजी महाराज म्हणतात, माझ्या झोपडीतली शांती किंवा सौख्य प्रत्यक्ष देवेंद्रला लाजवेल इतके भरभरून आहे.

**प्र ३.** राजमहालात मोठमोठ्या तिजोऱ्या आणि कडक पहारे, हे सारे असूनही तिथल्या संपत्तीची चोरी होतेच. पण माझ्या या झोपडीत दाराला साधी दोरीही नाही कारण चोरीला जायला अशी काही संपत्तीच माझ्याकडे नाही. माझ्याकडे संपत्तीपेक्षा मौल्यवान अशी पारमर्थिक संपन्नता आहे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ४.** | १. | राजवाडा | २. | खेडं | ३. | द्वार, दरवाजा | ४. | भय |
| | ५. | जमीन | ६. | नृप, नरेश | ७. | नेहमी, सतत | | |
| **प्र ५.** | १. | झोपडी | २. | अशांती | ३. | दु:ख | ४. | प्रजा |
| | ५. | शहर | | | | | | |
| **प्र ६.** | १. | एकवचन | २. | अनेकवचन | ३. | अनेकवचन | | |
| | ४. | एकवचन | ५. | एकवचन | ६. | अनेकवचन | | |

प्र ७. १. भूमी - मीन नमन नवरा  २. दार - रथ थवा वादळ

३. मऊ - ऊन नरम मऊ  ४. कंदील - लस सरिता ताकद

५. जमीन - नख खजूर रवी

## १२ हिरकणी गवळण

### ✦ पाठ परिचय

- शिवाजी महाराजांच्या कालखंडातील एक कथा. हिरकणी गवळण जी दूध विकायला रायगडावर जात असे. एक दिवस ती दूध विकायला गेली असता गडाचे दरवाजे बंद होतात, पण घरी तिचे तान्हे बाळ असते. त्या बाळाच्या ओढीने कठीण गडावरून कशी उतरते? व शिवराय या तिच्या शौर्याचे कसे कौतुक करतात? याची कथा पाठात वर्णिलेली आहे.

### ✦ उद्‌देश

- हिरकणीच्या उदाहरणातून स्त्रीच्या शौर्याची कथा विद्‌यार्थ्यांपर्यंत पोहचविणे.
- शिवराय हे चाणाक्ष व प्रजादक्षप्रिय राजे कसे होते तसेच शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीपणाची विद्‌यार्थ्यांना ओळख करून देणे.
- शिवकालीन कालखंडाची विद्‌यार्थ्यांना ओळख करून देणे.

### ✦ अध्यापन कृती

- (हिरकणी ह्या मराठी चित्रपटाचा व्हिडिओ दाखवून विद्‌यार्थ्यांना पाठाची कथा सांगू शकतो.) किंवा (गोष्टीरूपाने संपूर्ण पाठ समजावून हिरकणी गडावरून उतरते तो चित्रपटातील प्रसंग दाखवू शकता.)
- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांना शिवाजी महाराज व त्यांचे शौर्य याची ओळख करून देणे. हिरकणीच्या शौर्याची कथा विद्‌यार्थ्यांना गोष्टीरूपाने सांगावी रायगड-पाठ्‌यपुस्तकातील कथा संक्षिप्त रूपात विश्लेषण करत पाठ समजवावा.
- पाठाखालील स्वाध्याय विद्‌यार्थ्यांकडून सोडवून घेणे.

### ✦ उत्तरे

प्र १. १. हिरकणी दूध विकण्यासाठी गडावर जात असे. गडाचे दरवाजे रोज संध्याकाळी बंद होत असे. एकदा गडाचे दरवाजे बंद झाले की ते सकाळीच उघडते हा नियम होता. एकदा हिरकणी गडावर दूध विकायला गेली असता घरी परतताना दरवाजापर्यंत पोहचण्यास तिला उशीर झाला; परंतु तान्ह्या बाळाची तिला चिंता सतावत होती. बाळाच्या प्रेमापोटीच हिरकणीने किल्ल्याच्या कड्‌यावरून खाली उतरण्याचा निर्णय घेतला.

२. तान्ह्या बाळाच्या प्रेमापोटी हिरकणीने किल्ल्याच्या कड्‌यावरून खाली उरतण्याचा निर्णय घेतला. स्वत:चा जीव धोक्यात घालून आपल्या तान्ह्या बाळासाठी तिने हे धाडस केल; म्हणून त्या शूर मातेचा महाराजांनी साडी-चोळी देऊन सन्मान केला.

३. आपल्या तान्ह्या बाळाच्या प्रेमापोटी हिरकणीने कड्‌यावरून उरतण्याचे धाडस केले; त्या शूर मातेचा महाराजांनी साडी-चोळी देऊन सन्मान केला. ज्या कड्‌यावरून ती खाली उतरली त्या कड्‌यावर आईच्या प्रेमाची साक्ष म्हणून एक बुरूज बांधण्यात आला; म्हणून त्याला 'हिरकणी बुरूज' हे नाव देण्यात आले.

प्र २. १. मराठी साम्राज्याच्या राजधानीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले रायगड उभारला.

२. रायगडाबद्‌दल पूर्वी असे म्हटले जात असे की रायगडाचे दरवाजे बंद झाले की खालून वर येईल ती हवा आणि वरून खाली जाईल ते फक्त पाणी.

३. हिरकणी गवळण रायगडाच्या पायथ्याशी काही अंतरावर एक वाकुसरे (वाळूसरे) नावाच्या छोट्‌याशा गावात राहत होती.

४. हिरकणी गवळण रोज गडावर दूध विकण्यासाठी जात असे.

५. रायगडावर रोपवेने जाण्याचा मार्ग हिरकणीवाडीतूनच उपलब्ध आहे.

६. हिरकणीला तिच्या तान्ह्या बाळाची चिंता सतावत होती.

**प्र ३.** १. हिरकणी २. शिवाजी महाराज

३. गडकरी ४. हिरकणी

**प्र ४.** १. पायथ्याशी २. हिरा ३. कुशीत

४. आईच्या ५. उदरनिर्वाह

**प्र ५.** १. संपन्न होणे - पार पडणे.

वाक्य - आज लग्न सोहळा संपन्न झाला.

२. उदरनिर्वाह करणे - उपजिविका करणे.

वाक्य - सखाराम मोलमजूरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असे.

३. विनंती करणे - विनवणी/प्रार्थना करणे.

वाक्य - कार्यक्रमात खूप गोंधळ चालू असल्याने सरपंचांनी गावकऱ्यांना शांत राहण्याची विनंती केली.

४. चिंता सतावणे - काळजी वाटणे.

वाक्य - आईची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालल्यामुळे सर्वांनाच तिची चिंता सतावत होती.

**प्र ६.** १. किल्ला २. कथा ३. खेड

४. रजनी ५. रस्ता, वाट ६. दार

**प्र ७.** १. उघड २. खाली ३. कमी

४. दिवस ५. चढली ६. शहर

**प्र ८.** १. किल्ले २. दरवाजे ३. झाड

४. गोष्टी ५. साड्या

## १३ मायेची शिकवण

✦ **पाठ परिचय**

- साने गुरूजींनी लिहिलेली ही कथा. त्यात त्यांनी आपल्या लहानपणीची एक आठवण व त्यावर त्यांच्या आईने दिलेली शिकवण सांगितलेली आहे.

✦ **उद्देश**

- साने गुरूजींची ओळख करून देणे.
- साने गुरूजींच्या आईची शिकवण समजावून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- प्रथम पाठाची कथा ही गोष्टीरूपाने सांगून व्हिडिओ दाखवावा.
- नंतर पाठ्यपुस्तकाच्या आधारे पाठातील कथा विद्यार्थ्यांना समजवावी. श्यामच्या आईची शिकवण समजावून देताना काही नैतिक मूल्यांची ही ओळख व त्यावर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. लेखक लहानपणी छोप्पोपाणी, लंगडी, धावणे, लपंडाव, लक्षुंबाई ताक दे, डेरा फुटला

मडके दे असे नाना प्रकारचे खेळ खेळत असे खेळ खेळून आल्यावर ते आंघोळ करीत असे.

२. आई निरंजन घेऊन आल्यावर लेखकाला म्हणाली, "श्याम! पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस! तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो. देवाला सांग शुद्ध बुद्धी दे म्हणून."

३. नाही, यासाठी आपण तळमळत नाही. पण आपले शरीर व कपडे स्वच्छ राखण्यासाठी आपण धडपडतो आणि काळजीही घेतो. स्वच्छ कपडे रहावे म्हणून धोबी आहेत, बूट स्वच्छ रहावे म्हणून बूटपुश्ये आहेत. अंगाला लावायला चंदनी साबण आहेत. शरीर व कपड्यांना मळ लागू नये म्हणून आपण प्रयत्न करत असतो, परंतु मनाला स्वच्छ राखण्याबद्दल आपण जागृत नाही.

**प्र २.** १. निजण्याच्या आधी आंघोळ केल्याने शरीर स्वच्छ, निर्मळ व हलके वाटते.

२. लेखकाच्या लहानपणी अंग पुसण्यासाठी जुनेर असे.

३. लेखकाने हट्ट करून आंघोळ झाल्यावर पायाला माती लागू नये म्हणून ओचा पसरण्यास सांगितले.

४. मनाचे स्नान, शरीर व मन स्वच्छ असली म्हणजे झोप गाढ येते.

५. साने गुरूजींचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने होय.

**प्र ३.** १. आई श्यामला म्हणाली.

२. श्याम आईला म्हणाला.

३. आई श्यामला म्हणाली.

**प्र ४.** १. सायंकाळ २. रजनी ३. शरीर

४. स्वच्छ ५. नयन ६. चिंता

७. नशीबवान ८. निद्रा

**प्र ५.** १. दिवस २. शहर ३. अशुद्ध

४. दानव ५. पास ६. कडू

७. मृत्यू

**प्र ६.** १. मडकी २. फूल ३. पाय

४. लुगडी ५. वेली

**प्र ७.** १. आई २. देवी ३. लेखिका

४. धोबीण

## १४ शिवरायांची गुरूभक्ती

✦ **पाठ परिचय**

• शिवराय हे रामदास स्वामींचे शिष्य ते गुरूभक्त होते व गरूंसाठी काहीही करण्याची त्यांची तयारी असे. रामदास स्वामींचेही त्यांच्यावर खूप प्रेम होते. पण दोन शिष्यांना असे वाटे की स्वामी शिवबांवरच जास्त प्रेम करतात. आपल्या शिष्यांची परीक्षा घेण्यासाठी ते एक लीला आखतात. त्या लीलेत शिवबा खरे उतरतात. तेव्हा त्या दोन शिष्यांना कळून चुकते की स्वामी शिवबांवर का जास्त प्रेम करतात? ही सर्व कथा पाठात वर्णन केलेली आहे.

✦ **उद्देश**

- गुरु-शिष्यांच्या नात्यातील प्रेमाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- शिवरायांच्या गुरूभक्तीची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- गुरूंचा आदर सन्मान करावा ही भावना विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी शिवराय व स्वामी समर्थ यांच्याविषयी ओळख करून देणे.
- पाठातील कथा गोष्टीरूपाने विद्यार्थ्यांना सांगणे. नंतर पाठ्यपुस्तकातील पाठ, कठीण शब्द समजावत शिकवावा.
- स्वाध्याय सोडून घ्यावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. समर्थ रामदासांच्या दोन शिष्यांचा 'गुरूदेव आपल्यापेक्षा शिवबांवर जास्त प्रेम करतात. त्यांच्यामुळे आपल्यावर होणारा हा पक्षपात माझ्या काळजात काट्यासारखा रूतत आहे.' हा संवाद समर्थ रामदासांच्या कानावर पडला.

२. शिष्यांना जंगलात नेऊन समर्थांनी पूर्वनियोजनानुसार वाट विसरून घनदाट अरण्यात इतस्तत: भटकू लागले. सर्वजण जंगलातून मार्ग शोधत होते तेव्हा समर्थ अचानक पोट दुखण्याचे ढोंग करत एका गुहेत जाऊन झोपले आणि वेदनेने कण्हू लागले. अशी समर्थांनी शिष्यांना जंगलात नेऊन लीला केली.

३. शिवाजी महाराजांनी जंगलात गेल्यावर बघितले की गुहेत वेदनेमुळे समर्थ कण्हत आहेत. शिवाजी महाराजांना जेव्हा सामर्थांनी ह्या वेदनेवर केवळ वाघिणीचे ताजे दूध हेच औषध आहे असे सांगितल्यावर गुरूंसाठी वाघिणीचे दूध आणण्याचे ठरविले.

४. शिवाजी महाराजांनी वाघिणीला हात जोडून प्रार्थना केली की, "हे माते! मी तुझ्या पिलांचे व तुझे काही वाईट करण्यासाठी आलेलो नाही. माझ्या गुरूदेवांना होत असलेल्या पोटदुखीवर तुझे दूधच रामबाण उपाय आहे. गुरूसेवेपेक्षा मोठी या जगात दुसरी कोण तीही गोष्ट नाही. हे माते! मला सद्गुरूंची सेवा करू दे." हे ऐकताच ती वाघीण ही गरीब गाय बनली. तिच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला आणि संधी साधून तिचे दूध काढू लागले.

**प्र २.** १. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरू समर्थ रामदास स्वामी होते.

२. समर्थ रामदास शिष्यांना घेऊन जंगलात फिरायला गेले होते.

३. समर्थ रामदासांनी पोटदुखीवर वाघिणीचे दूध हे औषध सांगितले.

४. वाघीणी शिवाजी महाराजांची भक्ती आणि विनम्रता बघून शांत झाली.

५. समर्थांनी शिष्यांना जंगलात नेऊन पोट दुखण्याचे ढोंग केले.

**प्र ३.** १. समर्थांचा एक शिष्य दुसऱ्या शिष्याला म्हणाला.

२. समर्थ रामदास स्वामी शिवबांना म्हणाले.

३. शिवबा समर्थ रामदासांना म्हणाले.

४. शिवराय वाघिणीला म्हणाले.

५. समर्थ रामदास शिवबांना म्हणाले.

**प्र ४.** १. शिवराय २. समर्थ रामदास स्वामी
३. वाघीण ४. समर्थ रामदास स्वामी
५. समर्थ रामदास स्वामी

**प्र ५.** १. शंका २. वन ३. व्याधी
४. वदन ५. बहाणा ६. नृप, नरेश
७. धाडस

**प्र ६.** १. शिष्य २. सोपे ३. अशांत
४. जन्म ५. उजेड ६. कळत

**प्र ७.** १. वाघ २. बैल ३. राणी

**प्र ८.** १. राजे २. जंगले ३. डोळा
४. काटे

## १५ अभंगवाणी

### ✦ काव्य परिचय

- 'जैसा वृक्ष नेणे...' या अभंगवाणीत वृक्ष जसे दुसऱ्यांवर परोपकार करत असतात त्याप्रमाणे सज्जन माणसाचे वर्तन असते. अभंगात वृक्ष व सज्जन माणसे यात समानता सांगितली आहे.

### ✦ उद्‌देश

- वृक्षांची परोपकारवृत्ती विद्‌यार्थ्यांना समजावणे.
- वृक्षांची जपणूक करावी हे विद्‌यार्थ्यांना समजावणे.

### ✦ अध्यापन कृती

- वृक्ष इतरांसाठी कशाप्रकारे मदत करतात? हे विद्‌यार्थ्यांकडून प्रश्नांमार्फत काढून घेणे. त्यानंतर त्यांना वृक्ष व सज्जन माणसे यात कसे साम्य आहे हे समजावणे. पाठ्‌यपुस्तकातील अभंग शिकविताना उदाहरणासहित शिकविणे.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. अभंगवाणीत संत नामदेवांनी वृक्षाचे उदाहरण देऊन अभंग समजवला आहे.
२. अभंगवाणीमध्ये संत नामदेवांनी वृक्ष व सज्जन माणसे यांत कसे साम्य आहे याचे वर्णन केले आहे.
३. वृक्षांप्रमाणे एकमेकांत भेद सज्जन माणसे मानत नाहीत.
४. संत नामदेवांनी अभंगाच्या तिसऱ्या चरणात सांगितले आहे की वृक्षास कोणी इजा करीत असेल तरी ते त्यांना तोडू नका असे सांगत नाही.
५. संत नामदेवांनी या अभंगातून जगभर आनंद, प्रेम, समाधान आणि शांतता पसरवण्याचा संदेश दिला आहे.

**प्र २.** संत नामदेवांच्या या अभंगवाणीत जीवनविषयक तत्वज्ञान स्पष्ट केले आहे, जसे वृक्ष मान-अपमान व भेदभाव मानत नाही त्याप्रमाणे संताची वर्तणूक असते. वृक्षास कोण ी तोडत असेल, नुकसान, इजा करीत असेल तरी ते तोडू नको असे म्हणत नाही. त्याप्रमाणे संत, सज्जन हे निंदा आणि स्तुती एकसमान मानतात. त्यांच्यात संयम असतो. थोड्‌या आनंदाने नाचायला लागत नाही व दुःख पदरी पडले की रडत बसत नाही. या अभंगातून

कोणताही भेदभाव न मानता आपल्या कृतीतून जगभर आनंद, प्रेम, समाधान आणि शांतता पसरवण्याचा संदेश नामदेव महाराजांनी दिला आहे.

**प्र ३.** १. जसे वृक्ष मान-अपमान जाणत नाही, एकमेकांमध्ये भेदभाव मानत नाहीत. त्याप्रमाणे सज्जन माणसांचे वर्तन असते तेही भेदभाव न मानता सागळ्यांप्रति समान वागणूक देतात.

**प्र ४.** १. झाड, तरू   २. सभ्य   ३. दोषारोप
४. धाडस   ५. प्राण

**प्र ५.** १. दुर्जन   २. अपमान   ३. दु:ख   ४. अपूर्ण

**प्र ६.** १. संत तुकाराम   २. संत कबीर   ३. संत एकनाथ   ४. संत ज्ञानेश्वर
५. संत रामदास

## १६ व्याकरण

### १. नाम व नामाचे प्रकार

**प्र १.**

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|
| साबण | मातृछाया | कौतुक |
| मुलगी | शरद | आनंद |
| पापड | लोकमान्य टिळक | निंदा |
| शाळा | झाशी | परिश्रम |
| डोंगर | मध्यप्रदेश | म्हातारपण |

### २. सर्वनाम व सर्वनामाचे प्रकार

**प्र १.** १. आपण - आपण सर्व मिळून खेळूया.
२. त्याला - सागर त्याला पाणी आणून दे.
३. आम्ही - आम्ही उद्या तुमच्याकडे येणार आहोत.
४. त्याने - त्याने एक पुस्तक लिहिले आहे.
५. मी - मी खूप अभ्यास करीन.

**प्र २.** १. तिने, तिची/त्याने, त्याची   २. मला, तिला
३. आपले   ४. तिला/त्याला/मला   ५. कोण

**प्र ३.**

| | सर्वनाम | प्रकार |
|---|---|---|
| १. | तो | दर्शक सर्वनाम |
| २. | जसे, तसे | संबंधी सर्वनाम |
| ३. | तुम्ही | द्‌वितीय पुरुषवाचक सर्वनाम |
| ४. | तुझ्या | द्‌वितीय पुरुषवाचक सर्वनाम |
| ५. | स्वत: | आत्मवाचक सर्वनाम |

## ३. विशेषण व विशेषणाचे प्रकार

**प्र १.**

| | विशेषण | प्रकार |
|---|---|---|
| १. | असंख्य | संख्याविशेषण |
| २. | दुपटीने | संख्याविशेषण |
| ३. | ही | सार्वनामिक विशेषण |
| ४. | चांगला | गुणवाचक विशेषण |
| ५. | सुगंधी | गुणवाचक विशेषण |
| ६. | माझा | सार्वनामिक विशेषण |

## ४. क्रियापद व क्रियापदाचे प्रकार

**प्र १.** १. सकर्मक क्रियापद  २. अकर्मक क्रियापद  ३. अकर्मक क्रियापद
४. सकर्मक क्रियापद
५. अकर्मक क्रियापद  ६. अकर्मक क्रियापद

**प्र २.**

| | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|
| १. | आई | चटई | अंथरली |
| २. | प्रार्थना | – | संपली |
| ३. | गाय | दूध | देते |
| ४. | वीज | – | चकाकली |
| ५. | ससा | गाजर | खातो |